# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सायंकाळ )

जा.क्र. ४००/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांकः–१०/०७/२०१६.

**१) डोक्यावर मारुन जखमी केलयाने गुन्हा नोंद . :–**

दिनांक ०८/०७/०१६ रोजी १८.३० ते १९.०० वा. दर. फिर्यादी सौ. व्दारका प्रभु आषारकर, वय ६५ वर्ष, रा. भुयार ही तिच्या पती सोबत घरी हजर असतांना आरोपी हा दारु पिऊन फिर्यादीला शिवीगाळ करुन तिच्या घराची भिंत पाडीत होता, यावरून फिर्यादीने त्याला हटकले. आरोपीने फिर्यादिसोबत भांडण करुन दगडाने फिर्यादीच्या डोक्यावर मारुन जखमी केले. असे फिर्यादीचे तोंडी व डॉ. रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन पवनी येथे कलम ३२४,५०४ भादंवी अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. कटारे पो.स्टे. पवनी हे करीत आहेत.

**२) संगणमत करुन मारहान केली व जिवाने मारण्याची धमकी दिली . :–**

दिनांक ०९/०७/२०१६ रोजी १७.१० वा. दरम्यान फिर्यादी अमरजित मानक समरीत, वय ४० वर्ष, रा. डोंगरगाव, हे त्यांच्या शेतातील पाईप धु–यावर ठेवत असतांना आरोपी क्र. १ याने ''तुझी ही जागा नाही.'' असे म्हणुन फिर्यादि सोबत तोंडातोंडी भांडण केले. यावरुन फिर्यादी हा शेतातुन घरी परत जात असतांना आरोपी क्र. २ हा रस्त्यात भेटुन शेतीच्या कारणावरुन फिर्यादि सोबत भांडण, शिवीगाळ करुन ढकलढुकल केली व आरोपी क्र. १ व ३ यांनी आवाज देवुन बोलविले व आरोपी क्र. १ व ३ हे येवुन आरोपी क्र. १ ने आपल्या हातात लाकडी – लोखंडी कातवा घेवुन आला व संगणमत करुन फिर्यादीच्या डोक्यावर मारुन जखमी केले व शिवीगाळ करुन जिवाने मारण्याची धमकी दिली. असे फिर्यादी यांच्या तोंडी व डॉ. रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन आंधळगाव येथे कलम ३२४,५०४,५०६,३४ भादंवि अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. बाभरे पो. स्टे. आंधळगाव हे करीत आहेत.

पोलीस उपअधिक्षक(गृह)
भंडारा करिता.

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा
वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

प्रत, **संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.